दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. ५ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक - २७८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : ५ जुलै २०२६ वार : रविवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : पंचमी तिथी (दुपारी ०१:३० पर्यंत) त्यानंतर षष्ठी तिथी नक्षत्र : शततारका नक्षत्र (दुपारी ०३:१२ पर्यंत) त्यानंतर पूर्वाभाद्रपदा नक्षत्र योग : आयुष्मान योग (सायंकाळी ०४:३९ पर्यंत) त्यानंतर सौभाग्य योग करण : तैतुला करण (दुपारी ०१:३० पर्यंत)

### पुण्यात मुसळधार पावसाचा कहर

**पुणे :** खेड तालुक्यात दिवसभर झालेल्या मुसळधार पावसाने अनेक भागांना फटका बसला असून राजगुरुनगर येथे सिद्धिविनायक व्यापारी संकुलाची संरक्षण भिंत अचानक कोसळल्याची घटना घडली. भिंत कोसळतानाचा थरारक क्षण परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सततच्या जोरदार पावसामुळे संरक्षण भिंतीच्या पायाभागातील माती सैल झाली. पावसाचा जोर वाढताच भिंतीचा मोठा भाग अचानक कोसळला. या घटनेनंतर व्यापारी संकुल परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

## अनुदानित अल्पसंख्याक शाळांच्या भरतीवर शिक्षण विभागाचे निर्बंध लादणे बेकायदेशीर

### दिल्ली उच्च न्यायालयाचा स्पष्ट इशारा; प्रशासकीय हस्तक्षेपावर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अनुदानित अल्पसंख्याक शाळांच्या भरती प्रक्रियेवर शिक्षण विभागाला एकतर्फी निर्बंध लादता येणार नाहीत, असे स्पष्ट निरीक्षण दिल्ली उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. या निर्णयामुळे राज्याच्या शिक्षण प्रशासनाच्या अधिकारांवर आणि अल्पसंख्याक संस्थांच्या स्वायत्ततेवर पुन्हा एकदा वाद निर्माण झाला आहे.

प्रकरणात एका अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेने भरती प्रक्रियेवर शिक्षण विभागाने घातलेल्या मर्यादांना आव्हान दिले होते. शिक्षण विभागाने नियुक्त्या, पदभरती आणि मंजुरी प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की अनुदानित असले तरी अल्पसंख्याक शाळांना घटनेनुसार **(Article 30)** संस्थात्मक स्वायत्ततेचा मूलभूत अधिकार आहे.

न्यायालयाने नमूद केले की, शासनाकडून आर्थिक सहाय्य मिळत असल्यामुळे संस्थेचे नियंत्रण पूर्णतः प्रशासनाकडे जाते, असा अर्थ काढता येणार नाही. शिक्षण विभागाला केवळ नियमांचे पालन तपासण्यापुरती मर्यादित भूमिका असू शकते; परंतु भरती प्रक्रियेत थेट हस्तक्षेप करणे हे घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन ठरू शकते.

या निर्णयामुळे शिक्षण क्षेत्रात पुन्हा एकदा नियमन विरुद्ध स्वायत्तता हा जुना वाद तीव्र झाला आहे. सरकारी अनुदान घेतलेल्या शाळांवर पारदर्शक भरती प्रक्रिया आणि गुणवत्ता मानके लागू करणे आवश्यक असल्याचा प्रशासनाचा युक्तिवाद असतो. मात्र, अल्पसंख्याक संस्थांचा दावा असा आहे की त्यांच्या शैक्षणिक आणि व्यवस्थापकीय स्वातंत्र्यावर अतिक्रमण होता कामा नये. न्यायालयाच्या या



भूमिकेमुळे शिक्षण विभागाच्या हस्तक्षेप मर्यादांवर स्पष्टता आली असली, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर नवीन आव्हाने निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि गुणवत्तेचे निकष राखताना संस्थात्मक स्वातंत्र्य कितपत अबाधित राहील, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

तज्ज्ञांच्या मते, या निर्णयाने संविधानातील अल्पसंख्याक हक्क आणि राज्याच्या नियामक अधिकारांमध्ये असलेली सूक्ष्म सीमारेषा पुन्हा अधोरेखित केली आहे. शिक्षण क्षेत्रातील धोरणात्मक निर्णयांमध्ये भविष्यात अधिक स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वांची गरज भासू शकते, असेही मानले जात आहे.

## रस्ते, रेल्वे ट्रॅक पाण्याखाली, मुंबईत पावसाचे तांडव! पालघर, ठाणे, नवी मुंबईलाही तडाखा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई शनिवारी पावसाने कहर केला. शुक्रवारी (३ जुलै) रात्रीपासूनच पावसाचा जोर वाढला. त्यानंतर शनिवारी सकाळी अतिमुसळधार पाऊस बरसला. त्यामुळे मुंबई, मुंबई उपनगरे, ठाणे, नवी मुंबई, पालघर या भागांत जनजीवन विस्कळीत झाले. अनेक ठिकाणी रस्त्यावर कमरेइतके पाणी साचले, तर काही ठिकाणी रेल्वे रुळही पाण्याखाली गेल्याने मुंबई लोकल रेल्वे सेवेवरही परिणाम झाला.

मुंबईत पहाटेपासूनच अतिमुसळधार पाऊस सुरू झाला. पावसाचा जोर कायम राहिल्याने दुपारनंतर अनेक भागांमधील रस्ते पाण्याखाली गेले. पश्चिम उपनगरांमधील अनेक भागांमध्ये रस्त्यांवर कमरेइतके पाणी भरले होते. त्यामुळे पश्चिम रेल्वे मार्गावरील लोकल सेवा मंदावली.

भांडुप, मुलुंडसह पूर्व उपनगरातील अनेक भागांमध्ये अतिमुसळधार पावसाने दुपारनंतर रस्त्यावर पाणी साचण्यास सुरूवात झाली. त्यामुळे रस्ते वाहतूक मंदावली. तर काही ठिकाणी लोकांना पाण्यातून वाट काढताना कसरत करावी लागली.

हार्बर लाईनवरील चुनाभट्टीसह इतर काही ठिकाणी रेल्वे रुळांवर पाणी साचल्यामुळे लोकल सेवा मंदावली होती. त्यामुळे घराकडे निघालेल्या प्रवाशांना त्रासाला सामोरं जावे लागत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडून पनवेलकडे धावणाऱ्या लोकल ४०-५० मिनिटे उशिराने धावत आहेत. तर पनवेलकडून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या लोकलही अर्धा तास उशिराने धावत आहेत.

### सारांश वृत्त

## वेगळ्या तमिळनाडूची मागणी ही गुन्हेगारी नाही; ती मानसिक आरोग्याशी जोडली जाईल : मद्रास उच्च न्यायालयाची निरीक्षणात्मक टिप्पणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** भारताच्या विद्यमान सामाजिक वास्तवात जर कोणी तमिळनाडू वेगळे राष्ट्र असावे अशी मागणी केली, तर ती ाशिवळींळेप (राजद्रोह) म्हणून पाहिली जाणार नाही, तर त्या वक्तव्याकडे मानसिक आरोग्याच्या दृष्टीने पाहिले जाईल, असे निरीक्षण मद्रास उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. हा निकाल एका जुन्या खटल्यात सेडिशन आरोप रद्द करताना देण्यात आला. न्यायालयाने स्पष्ट केले की आजच्या परिस्थितीत देश एकात्मिक आहे आणि अशा प्रकारच्या फुटीरतावादी विधानांमुळे सरकारविरुद्ध द्वेष निर्माण होतो, असे मानणे योग्य ठरणार नाही. उलट अशा वक्तव्यांमुळे सामान्य नागरिकांमध्ये केवळ अस्वस्थता किंवा रपपूरपलश निर्माण होऊ शकते, असे न्यायालयाने नमूद केले. या निरीक्षणामुळे कायदेशीर तसेच सामाजिक पातळीवर मोठी चर्चा सुरू झाली आहे. एका बाजूला न्यायालय अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि गुन्हेगारी कायद्याच्या मर्यादा स्पष्ट करत असल्याचे दिसते, तर दुसऱ्या बाजूला अशा विधानांना थेट मानसिक आरोग्याशी जोडणे या भाषेवर टीका होण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. न्यायालयाने संबंधित प्रकरणात प्रकाशकांविरुद्ध दाखल करण्यात आलेला सेडिशनचा गुन्हा रद्द केला. संबंधित पुस्तकात १९६७ मधील तमिळनाडू वेगळे राष्ट्र असावे या ऐतिहासिक विधानाचा उल्लेख होता. न्यायालयाने सांगितले की ऐतिहासिक संदर्भातील मजकूर आजच्या काळात गुन्हेगारी स्वरूपाचा ठरत नाही. या निर्णयामुळे एक महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहेराजकीय मतप्रदर्शन आणि गुन्हेगारी कृत्य यामधील सीमारेषा. न्यायालयाने अप्रत्यक्षपणे सूचित केले की केवळ कल्पना किंवा राजकीय मत मांडणे म्हणजे देशद्रोह ठरत नाही,

## १० हजारांच्या लाचेपासून कोट्यवधींच्या संपत्तीचा पर्दाफाश; अकोल्याच्या मुद्रांक जिल्हाधिकाऱ्याच्या घरात घबाड!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जळगाव :** जळगावमध्ये अकोल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी किरण चौधरी यांच्या निवासस्थानी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (अउइ) मोठी कारवाई करत खळबळ उडवली आहे. केवळ १० हजार रुपयांच्या लाच प्रकरणातून सुरू झालेला तपास थेट कोट्यवधींच्या संपत्तीपर्यंत पोहोचल्याचे समोर आले आहे.

अउइ पथकाने जळगाव येथील घरावर छापा टाकून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, सोने-चांदीचे दागिने तसेच अनेक मालमत्तांशी संबंधित कागदपत्रे जप्त केली आहेत.

प्राथमिक अंदाजानुसार या सर्व मुद्देमालाची किंमत सुमारे ३ कोटी रुपयांच्या आसपास असल्याचे सांगितले जात आहे.

कारवाईदरम्यान घरात रात्री उशिरापर्यंत रोख रकमेची मोजदाद सुरू होती. अचानक झालेल्या या छाप्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, अधिकाऱ्यांच्या संपत्तीबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

लहान लाच प्रकरणातून सुरू झालेला हा तपास आता मोठ्या आर्थिक अनियमिततेच्या दिशेने जात असल्याचे स्पष्ट होत आहे. अउइ कडून पुढील तपास सुरू असून, आणखी मालमत्ता उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## सहकार क्षेत्राला ‘नवे बळ’ की जुन्याच धोरणांचा पुनरुच्चार? फडणवीसांचे प्रतिपादन, पण प्रश्न कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** सहकार क्षेत्र हेच ग्रामीण विकासाचे सर्वात प्रभावी साधन असून केंद्र आणि राज्य सरकारच्या धोरणांमुळे या क्षेत्राला नवे बळ मिळत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित ‘सहकार गौरव पुरस्कार सोहळ्या’त ते बोलत होते.

फडणवीस यांनी सहकार चळवळीचा इतिहास सांगताना महाराष्ट्राने शतकभरापूर्वीच शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याची भूमिका घेतली होती, असे नमूद केले. सहकारी पतसंस्था, बँका, साखर कारखाने आणि गृहनिर्माण संस्थांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळाल्याचा दावा त्यांनी केला.

तथापि, केंद्र सरकारने २०२१ मध्ये स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन केल्यापासून धोरणात्मक बदलांची गती वाढल्याचे सांगत त्यांनी राष्ट्रीय सहकार धोरण, पॅक्सचे डिजिटायझेशन, नवीन सहकारी संस्था आणि निर्यात-संबंधित उपक्रमांचा उल्लेख केला. सहकारी साखर कारखान्यांचा १० हजार कोटी रुपयांचा आयकर माफ करणे आणि इथेनॉल धोरणामुळे उद्योगाला दिलासा मिळाल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

मात्र, या घोषणांमागे सहकार क्षेत्र खरोखरच स्वायत्त आणि सक्षम होत आहे का, की ते अधिकाधिक सरकारी धोरणांवर अवलंबून बनत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सहकारी संस्थांचे मोठे जाळे असूनही अनेक जिल्हा बँका आणि पतसंस्थांच्या आर्थिक स्थितीवर वेळोवेळी प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. फडणवीस यांनी सहकारी बँकांनी कॉर्पोरेट बँकांपेक्षा चांगली कामगिरी केल्याचा दावा केला. परंतु वित्तीय शिस्त, व्यवस्थापनातील राजकीय हस्तक्षेप आणि कर्जवाटपातील पारदर्शकतेबाबत सहकार क्षेत्रावर दीर्घकाळापासून टीका होत आली आहे. गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या स्वयं पुनर्विकास योजनेचा उल्लेख करत त्यांनी



नागरिकांना मोठ्या घरांचे स्वप्न पूर्ण होत असल्याचे सांगितले. मात्र, मुंबईतील प्रलंबित पुनर्विकास प्रकल्प, वित्तपुरवठा आणि मंजुरी प्रक्रियेतील विलंब हे प्रश्न अद्याप कायम आहेत.

कार्यक्रमात विविध मान्यवरांचा गौरव करण्यात आला. ‘सहकार महर्षी’, ‘सहकार भूषण’ यांसारख्या पुरस्कारांद्वे क्षेत्रातील योगदानाची दखल घेतली गेली.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सहकार आणि लोकशाही परस्परपूरक असल्याचे मत व्यक्त केले, तर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सहकारविषयक साहित्यालाही राज्य पुरस्कारांमध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव मांडला.

दरम्यान, सहकार क्षेत्राला धोरणात्मक बळ मिळत असल्याचा सरकारचा दावा असला तरी, जमिनीवरील वास्तव, आर्थिक पारदर्शकता आणि संस्थात्मक स्वायत्तता या मुद्द्यांवर व्यापक चर्चा अद्याप अपुरीच असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत पुणे जिल्ह्याचा ‘डंका’; झेडपी शाळांच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने जाहीर केलेल्या इयत्ता पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालात पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांनी उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात आपला ठसा उमटवला आहे. या निकालात पुणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत सर्वाधिक समावेश झाल्याने ग्रामीण शाळांच्या शैक्षणिक दर्जावर पुन्हा एकदा प्रकाशझोत पडला आहे.

आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत धानोरे येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीनी आर्या पारेकर हिने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, आर्या ही एका मजुराची मुलगी असून तिच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाच्या संधींचा प्रभावी वापर होत असल्याचे दिसून येते. तिच्या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

त्याचप्रमाणे टाकळकरवाडी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी श्रेयस साळुंके याने राज्यात दुसरा क्रमांक मिळवत पुणे जिल्ह्याच्या यशात आणखी भर घातली आहे. दोनही विद्यार्थ्यांच्या यशामुळे जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता आणि शिक्षकांचे योगदान अधोरेखित झाले आहे.

या निकालानंतर पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांचा ‘डंका’ वाजल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात सुरू आहे. शहरी खासगी शाळांच्या तुलनेत कमी साधनसंपत्ती असतानाही जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर मिळवलेले यश लक्षणीय मानले जात आहे. दरम्यान, या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, नियमित सराव, तसेच शालेय स्तरावर राबवण्यात आलेल्या विशेष तयारी शिबिरांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, ग्रामीण शाळांमध्ये अजूनही मूलभूत सुविधा, डिजिटल साधने आणि शिक्षकांची उपलब्धता याबाबत तफावत असल्याची वस्तुस्थिती दुर्लक्षित करता येत नाही. या निकालामुळे जिल्हा परिषद शाळांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावली असल्याचे चित्र दिसत असले तरी, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारचे सातत्य राखण्यासाठी धोरणात्मक गुंतवणूक आणि शाश्वत शैक्षणिक सुधारणा आवश्यक असल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे. पुणे जिल्ह्याच्या या यशामुळे ग्रामीण शिक्षण व्यवस्थेची क्षमता पुन्हा एकदा अधोरेखित झाली असली, तरी ही यशोगाथा राज्यभर समान पातळीवर पोहोचवण्याचे आव्हान अद्याप कायम आहे.

## बॉम्बे हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय: दस्तऐवज न देणाऱ्या सहकारी गृहनिर्माण समिती सदस्यांची बडतर्फी वैध ठरवली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** सहकारी गृहनिर्माण संस्थांतील पारदर्शकता आणि कायदेशीर जबाबदारीबाबत मोठा संदेश देत बॉम्बे हायकोर्टाने असा निर्णय कायम ठेवला आहे की, दस्तऐवज पुरवण्यात जाणूनबुजून अपयशी ठरलेल्या व्यवस्थापन समिती सदस्यांची बडतर्फी वैध ठरू शकते.

प्रकरणात सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापन समितीतील काही सदस्यांनी सभासदांना आवश्यक कागदपत्रेजसे की आर्थिक हिशेब, अहवाल आणि इतर प्रशासकीय दस्तऐवज पुरवण्यास टाळाटाळ केल्याचे नोंदवले गेले होते. ही कागदपत्रे महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यानुसार (Maharashtra Cooperative Societies Act, 1960) आणि संबंधित नियमांनुसार सभासदांना उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. राज्य सहकार विभागाने संबंधित सदस्यांवर कारवाई करत त्यांना समितीतून अपात्र (disqualify) ठरवले होते. या आदेशाला आव्हान देण्यात आले असता, उच्च न्यायालयाने तो निर्णय कायम ठेवत स्पष्ट केले की, व्यवस्थापन समिती ही केवळ सत्ताधारी यंत्रणा नसून सभासदांप्रती उत्तरदायी संस्था आहे. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, जेव्हा समिती सदस्य जाणूनबुजून माहिती लपवतात किंवा कायद्यानुसार आवश्यक दस्तऐवज देण्यास नकार देतात, तेव्हा तो केवळ प्रशासकीय त्रुटी नसून गंभीर गैरव्यवस्थापन ठरतो.

## महाराष्ट्र शासनाच्या अपडेट्ससाठी नवे डिजिटल प्लॅटफॉर्म : व्हॉट्सॲप चॅनल आणि पब्लिक ॲपवर अधिकृत उपस्थिती; पण पारदर्शकता आणि प्रभावीतेवर प्रश्न कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** नागरिकांपर्यंत अधिकृत आणि प्रमाणित शासकीय माहिती जलद पोहोचवण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने (DGIPR) आता दोन प्रमुख डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर अधिकृत उपस्थिती नोंदवली आहे. शासनाचे अधिकृत अपडेट्स आता ‘व्हॉट्सॲप चॅनल’ आणि ‘पब्लिक ॲप’च्या माध्यमातून थेट नागरिकांपर्यंत पोहोचणार आहेत, असा दावा करण्यात आला आहे.

शासनाने जाहीर केले आहे की नागरिक आता "DGIPR, Govt of Maharashtra' या नावाने व्हॉट्सॲप चॅनलवर आणि ‘महाराष्ट्र शासन (mahadgipr)' या नावाने पब्लिक ॲपवर शासकीय घडामोडी, योजना, आणि विविध उपक्रमांची माहिती मिळवू शकतील. या उपक्रमामुळे माहितीचा प्रसार अधिक वेगवान, थेट आणि ‘अधिकृत’ होईल, असे शासनाचे म्हणणे आहे.

**डिजिटल विस्तार की माहिती केंद्रीकरण?**

या निर्णयाकडे सरकारकडून डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनचा भाग म्हणून पाहिले जात असले तरी, तज्ज्ञांच्या मते हा एक प्रकारचा माहिती केंद्रीकरणाचा प्रयत्नही ठरू शकतो. व्हॉट्सॲपसारख्या व्यापक वापरल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्मवर सरकारी चॅनल सुरू केल्यामुळे माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचणार असली तरी, त्यात कोणती माहिती किती प्रमाणात दिली जाते आणि कोणती माहिती वगळली जाते, यावर प्रश्न उपस्थित होतात.

सरकारकडून ‘अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती’ दिली जाईल, असा दावा केला जात असला तरी, स्वतंत्र माध्यमे आणि पत्रकारितेच्या भूमिकेला यामुळे अप्रत्यक्ष मर्यादा येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. माहितीचा स्रोत थेट शासनाकडून असल्यामुळे ‘फिल्टर न झालेली’ माहिती नागरिकांपर्यंत पोहोचते का, हा देखील चर्चेचा मुद्दा आहे.

**DGIPR च्या भूमिकेचा विस्तार**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय हे शासन आणि नागरिक यांच्यातील संवादाचे प्रमुख माध्यम म्हणून कार्यरत आहे. विविध सरकारी योजना, लोकोपयोगी उपक्रम आणि धोरणांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे तसेच जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहोचवणे, ही या संस्थेची दुहेरी जबाबदारी असल्याचे सांगितले जाते.

मात्र, डिजिटल माध्यमांमध्ये वाढत्या उपस्थितीमुळे ¦GIPR ची भूमिका आता केवळ माहिती प्रसारापुरती मर्यादित राहते की ती ‘नॅरेटिव्ह मॅनेजमेंट’कडे झुकते, हा प्रश्न उपस्थित होत आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर सरकारची सक्रियता वाढत असताना, माहितीच्या निष्पक्षतेबाबत सतत चर्चा होत आहे.

**नागरिकांसाठी सोय की एकतर्फी संवाद?**

व्हॉट्सॲप आणि पब्लिक ॲपवर सरकारची उपस्थिती ही नागरिकांसाठी सोयीची ठरू शकते. एका क्लिकवर अधिकृत माहिती उपलब्ध होणे, ही निश्चितच जलद संवादाची सुविधा आहे. विशेषतः शासकीय योजना, आपत्कालीन सूचना आणि धोरणात्मक निर्णय याबाबत तत्काळ माहिती मिळणे हा या उपक्रमाचा सकारात्मक पैलू मानला जातो.

परंतु याचबरोबर एकतर्फी संवादाची शक्यता नाकारता येत नाही. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर माहिती प्रसारित करणे सोपे असले तरी, त्यावर प्रश्न विचारणे, स्वतंत्र पडताळणी करणे आणि विरोधी दृष्टिकोन मांडणे यासाठी तितकीच जागा उपलब्ध आहे का, हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो.

**डिजिटल यंत्रणेचा वाढता प्रभाव**

‘पब्लिक ॲप’सारख्या हायपरलोकल कंटेंट देणाऱ्या प्लॅटफॉर्मवर सरकारची उपस्थिती वाढणे हे डिजिटल यंत्रणेच्या विस्ताराचे लक्षण मानले जात आहे. शासनाच्या म्हणण्यानुसार, या माध्यमातून स्थानिक पातळीवरील माहिती अधिक वेगाने आणि प्रभावीपणे पोहोचवता येईल.

मात्र, अशा प्लॅटफॉर्म्सवर सरकारी उपस्थिती वाढल्याने माहितीची विविधता कमी होण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. डिजिटल स्पेसमध्ये सरकारी आणि खासगी माहितीचा समतोल राखणे हे मोठे आव्हान ठरू शकते.

**निष्कर्ष: वेगवान माहिती, पण संतुलनाची गरज**

महाराष्ट्र शासनाचा हा उपक्रम डिजिटल गव्हर्नन्सच्या दिशेने एक पाऊल म्हणून पाहिला जात असला तरी, माहितीची पारदर्शकता, विविधता आणि स्वतंत्रता याबाबत प्रश्न कायम आहेत. व्हॉट्सॲप चॅनल आणि पब्लिक ॲपच्या माध्यमातून माहिती अधिक वेगाने मिळणार असली तरी, तिच्या सखोलतेचा आणि वस्तुनिष्ठतेचा प्रश्न भविष्यात अधिक महत्त्वाचा ठरू शकतो.

डिजिटल माध्यमांचा वापर वाढत असताना, केवळ प्रसार नव्हे तर संतुलित माहिती देण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची असल्याचे या निर्णयातून पुन्हा एकदा अधोरेखित होते.

## संपादकीय

### २५० वर्षांची अमेरिका : महासत्तेचा प्रवास, लोकशाहीचे धडे आणि भारतासाठीचे प्रश्न

४ जुलै १७७६ रोजी स्वातंत्र्याची घोषणा करून अमेरिकेने ब्रिटिश वसाहतवादाला आव्हान दिले. आज, २५० वर्षांच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या अमेरिकेकडे जग एका महासत्तेच्या रूपात पाहते. विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, संरक्षण, शिक्षण आणि नवोपक्रम या क्षेत्रांत अमेरिकेने जागतिक नेतृत्व निर्माण केले आहे. परंतु हा प्रवास केवळ यशाचा नाही; तो संघर्ष, अंतर्विरोध, सामाजिक बदल आणि लोकशाहीच्या सततच्या परीक्षांचाही इतिहास आहे. भारताच्या दृष्टीने अमेरिकेच्या या प्रवासाकडे केवळ कौतुकाने नव्हे, तर चिकित्सक नजरेने पाहण्याची गरज आहे.

अमेरिकेच्या स्थापनेचा पाया स्वातंत्र्य आणि समान हक्क या मूल्यांवर रचला गेला. परंतु स्वातंत्र्याची घोषणा झाल्यानंतरही गुलामगिरी जवळपास शतकभर टिकून राहिली. यादवी युद्ध, गुलामगिरीची समाप्ती, आफ्रिकन–अमेरिकन नागरिकांचे नागरी हक्क आंदोलन आणि महिलांच्या मतदानाच्या अधिकारासाठी झालेला दीर्घ संघर्ष हे दाखवून देतात की लोकशाहीची घोषणा आणि तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये मोठी दरी असू शकते.

आजही अमेरिकेत वांशिक असमानता, बंदूक हिंसा, स्थलांतराचा प्रश्न, राजकीय ध्रुवीकरण आणि सामाजिक विषमता यांसारखी आव्हाने कायम आहेत. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असूनही लाखो नागरिकांना आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षेच्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यामुळे महासत्ता होणे म्हणजे सर्व समस्या संपणे नव्हे, हे अमेरिकेचे वास्तव अधोरेखित करते.

तथापि, अमेरिकेची एक मोठी ताकद म्हणजे तिच्या संस्थांची क्षमता. राष्ट्राध्यक्षांपासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत, प्रसारमाध्यमांपासून विद्यापीठांपर्यंत आणि संशोधन संस्थांपासून नागरी समाजापर्यंत विविध संस्था सतत सार्वजनिक धोरणांवर प्रश्न उपस्थित करत राहतात. लोकशाहीमध्ये मतभेद हे कमकुवतपणाचे नव्हे, तर संस्थात्मक ताकदीचे लक्षण असू शकतात, हा धडा अमेरिकेच्या अनुभवातून मिळतो.

भारतासाठी या प्रवासात अनेक सकारात्मक प्रेरणाही आहेत. उच्च शिक्षण, संशोधन, स्टार्टअप संस्कृती, नवोपक्रम, कृत्रिम बुद्धिमत्ता, अवकाश संशोधन आणि उद्योजकतेत अमेरिकेने जगासाठी मानके निर्माण केली. भारतीय वंशाच्या लाखो नागरिकांनी अमेरिकेच्या अर्थव्यवस्था, आरोग्य, तंत्रज्ञान आणि शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. सिलिकॉन व्हॅलीपासून नासापर्यंत भारतीयांची उपस्थिती दोन्ही देशांतील मानवी संसाधनांच्या परस्परपूरक नात्याची साक्ष देते.

भारत–अमेरिका संबंधही गेल्या दोन दशकांत लक्षणीय बदलले आहेत. संरक्षण सहकार्य, व्यापार, सेमीकंडक्टर, स्वच्छ ऊर्जा, क्वाडसारखी बहुपक्षीय भागीदारी आणि इंडो–पॅसिफिकमधील धोरणात्मक सहकार्य यामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ झाले आहेत. चीनच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर भारत आणि अमेरिका अनेक सामरिक मुद्द्यांवर एकत्र येताना दिसतात.

मात्र, भारताने अमेरिकेकडून प्रेरणा घेताना अंधानुकरण टाळणे आवश्यक आहे. अमेरिकेची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय रचना भारतापेक्षा वेगळी आहे. भारताचे लोकसंख्यात्मक वैविध्य, भाषिक विविधता आणि संघराज्य व्यवस्था लक्षात घेता भारतीय विकासाचा मार्ग भारतीय वास्तवाशी सुसंगत असला पाहिजे. कोणत्याही महासत्तेचे मॉडेल जसेच्या तसे स्वीकारणे हे शहाणपणाचे ठरणार नाही.

याचबरोबर अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाकडेही संतुलित नजरेने पाहणे गरजेचे आहे. लोकशाही आणि मानवी हक्कांचा पुरस्कार करताना विविध काळात अमेरिकेने जगातील अनेक संघर्षांमध्ये लष्करी हस्तक्षेप केले. काही हस्तक्षेपांमुळे प्रादेशिक अस्थिरता वाढल्याची टीका आंतरराष्ट्रीय स्तरावर झाली आहे. त्यामुळे जागतिक नेतृत्वासोबत जागतिक जबाबदारीही तितकीच महत्त्वाची असते, हा संदेश या इतिहासातून मिळतो. भारतासाठी सर्वात महत्त्वाचा धडा म्हणजे मजबूत संस्था, वैज्ञानिक विचार, शिक्षणातील गुंतवणूक आणि नवोपक्रम यांशिवाय दीर्घकालीन प्रगती शक्य नाही. लोकशाही केवळ निवडणुकांवर उभी राहत नाही; ती उत्तरदायित्व, स्वतंत्र संस्था, मुक्त माध्यमे, न्यायव्यवस्था आणि सक्रिय नागरिक यांवर टिकून राहते. अमेरिकेच्या २५० वर्षांच्या प्रवासाचे मूल्यमापन करताना दोन वास्तव समोर येतात. एक म्हणजे अपूर्व आर्थिक, वैज्ञानिक आणि सामरिक यश; दुसरे म्हणजे त्या यशामागील सततचा आत्मपरीक्षणाचा प्रवास. या दोन्ही पैलूंमधून भारताने शिकण्यासारखे बरेच काही आहे. अखेरीस, अमेरिकेची २५० वर्षांची कहाणी ही केवळ एका राष्ट्राच्या महासत्ता बनण्याची कथा नाही. ती लोकशाहीच्या सतत चालणाऱ्या प्रयोगाची, संस्थांच्या सामर्थ्याची आणि चुका मान्य करून सुधारणा करण्याच्या क्षमतेची कहाणी आहे. भारतासाठी खरा धडा असा की, जागतिक शक्ती होण्याचा मार्ग केवळ आर्थिक वाढीत नाही, तर मजबूत लोकशाही संस्था, सामाजिक समावेशकता, वैज्ञानिक दृष्टी आणि संविधानिक मूल्यांप्रती असलेल्या निष्ठेत दडलेला आहे.

# राजमाचीचा लोणावळ्याशी संपर्क तुटला; मुसळधार पावसात १०० फूट रस्ता खचला, पर्यटक अडकले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणावळा :** मुसळधार पावसामुळे लोणावळा–राजमाची मार्गावर शनिवारी दुपारी मोठी दरड कोसळली. या दुर्घटनेत सुमारे १०० ते १२५ फूट रस्ता माती, दगड आणि राडारोड्याखाली गडप झाला असून राजमाची गावाचा लोणावळ्याशी थेट संपर्क तुटला आहे. रस्ता बंद झाल्याने राजमाची गाव आणि कातळधार धबधबा परिसरात गेलेले अनेक पर्यटक अडकून पडले आहेत.

दुपारी सुमारे १२.३५ ते १ वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली. दरड कोसळलेल्या भागाच्या पलीकडे ३० ते ३५ दुचाकी तसेच काही चारचाकी वाहने अडकली आहेत. पायी गेलेल्या काही पर्यटकांनी मोठ्या कष्टाने लोणावळ्याकडे परतीचा प्रवास केला; मात्र वाहनांसह गेलेल्या पर्यटकांची गैरसोय सुरू आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. घटनेनंतर स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. डेला रिसॉर्टच्या कर्मचाऱ्यांच्या बचाव पथकानेही मदतकार्य सुरू केले असून जेसीबीच्या सहाय्याने राडारोडा हटविण्याचे काम सुरू आहे. लोणावळा शहर पोलीस निरीक्षक सचिन पाटील आणि कामशेत पोलीस निरीक्षक पवार यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

दरडीचे प्रमाण मोठे असल्याने मार्ग तातडीने वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता कमी आहे. रस्ता पूर्णपणे सुरू करण्यासाठी किमान दोन दिवस लागू शकतात, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पर्यटकांनी राजमाची आणि कातळधार परिसराकडे जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**पावसाळ्यात राजमाचीचा रस्ता पुन्हा धोकादायक**

लोणावळ्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर असलेल्या राजमाचीसाठी सुरक्षित आणि सर्वहंगामी रस्त्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. मात्र दरवर्षी पावसाळ्यात दरडी कोसळणे, रस्ता खचणे, चिखल आणि वाहतूक बंद होण्याच्या घटना घडत असल्याने ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत होते.

या मार्गावरील अडचणींचा फटका केवळ पर्यटकांनाच बसत नाही. राजमाचीतील विद्यार्थी, शेतकरी, आजारी नागरिक आणि रोजच्या गरजांसाठी लोणावळ्यावर अवलंबून असलेल्या ग्रामस्थांनाही मोठा त्रास सहन करावा लागतो. आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय मदत किंवा इतर यंत्रणा गावापर्यंत पोहोचविणेही कठीण होते.



**ग्रामस्थांनी पर्यटकांना दिला आधार**

रस्ता खचल्याने अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षित ठिकाणी नेणे, आवश्यक माहिती देणे आणि बचाव पथकाला सहकार्य करणे, अशी महत्त्वाची भूमिका स्थानिक ग्रामस्थांनी बजावली. संकटाच्या वेळी ग्रामस्थांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे पर्यटकांना मोठा दिलासा मिळाला.

**सुरक्षित रस्त्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर**

राजमाचीसाठी कायमस्वरूपी, मजबूत आणि सर्वहंगामी रस्ता नेमका कधी होणार, असा प्रश्न स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे. प्रत्येक पावसाळ्यात रस्ता बंद होणे, पर्यटक अडकणे आणि गावाचा संपर्क तुटणे या घटनांची पुनरावृत्ती थांबविण्यासाठी प्रशासनाने तातडीने दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## पिसोळीतील फार्महाऊसवर छापा; हुक्का विक्रीसह सेवन करणाऱ्यांवर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** कोंढवा परिसरातील पिसोळी येथील एका फार्महाऊसवर छापा टाकून बेकायदा हुक्का विक्री व सेवन सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आणत काळेपडळ पोलिसांनी ७५ लाख ८० हजार ७३९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी अनिस सय्यद व त्याचा साथीदार साद सय्यद यांच्यासह संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील अवैध धंदे, तडीपार आरोपी व गुन्हेगारांवर कारवाई करण्याच्या दिलेल्या सूचनांनुसार काळेपडळ पोलिस ठाण्याचे पथक गस्त घालत होते. त्यावेळी पोलिस अंमलदार महादेव शिंदे आणि अतुल पंधरकर यांना गोपनीय माहिती मिळाली की, पिसोळी येथील आंबिका हॉटेल रोड, जगदंबा मार्ग परिसरातील एका फार्महाऊसमध्ये अनिस सय्यद व साद सय्यद हे बेकायदा हुक्का विक्री करत आहेत.

माहितीची खातरजमा करून पोलिसांनी छापा टाकला असता, तेथे ८ ते १० जण हुक्क्याचे सेवन करताना आढळले. कारवाईदरम्यान पोलिसांनी तीन चारचाकी, दोन दुचाकी, १२ मोबाइल, ८ हुक्का पॉट, तंबाखूजन्य हुक्का फ्लेवर व इतर साहित्य असा एकूण ७५ लाख ८० हजार ७३९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी काळेपडळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून सहायक पोलिस निरीक्षक अमित शेटे पुढील तपास करत आहेत.

ही कारवाई पोलिस उपायुक्त जीवन बेनिवाल, सहायक पोलिस आयुक्त अतुलकुमार नवगिरे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरिषा निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक (गुन्हे) अण्णासो बाबर यांच्या सूचनेनुसार सहायक पोलिस निरीक्षक अमित शेटे, उपनिरीक्षक रघुवीर खोडा तसेच पोलिस अंमलदार प्रवीण काळभोर, दाऊद सय्यद, प्रतीक लाहीगुडे, शाहिद शेख, नीलेश देसाई, अमोल फडतरे, अतुल पंधरकर, विशाल ठोंबरे, लक्ष्मण काळे, नितीन ढोले, सद्दाम तांबोळी, प्रदीप बेडीसकर, महादेव शिंदे, गिरीराज जगदाळे, नंदकुमार जावळे, ज्ञानेश्वर कुलाळ, अक्षय जगताप, शुभम पवार आणि मेघराज जाधव यांच्या पथकाने केली.

## सांगवी जिल्हा रुग्णालयाचे ‘सुपर स्पेशालिटी’मध्ये रूपांतर होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** सांगवी जिल्हा रुग्णालयाचे ‘सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल’मध्ये रूपांतर करण्यात येणार असल्याची ग्वाही राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री डॉ. प्रकाश आबिटकर यांनी रुग्णालयाच्या पाहणीदरम्यान दिली. यामुळे हृदयरोग, मेंदूविकार, किडनी विकार यांसारख्या गंभीर आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचाराची सुविधा उपलब्ध होणार आहे.

आमदार शंकर जगताप यांच्या पाठपुराव्यानंतर झालेल्या या पाहणीत




आरोग्यसेवा, रुग्ण सुविधा आणि यंत्रसामग्रीचा आढावा घेण्यात आला. सर्वसामान्य नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्यात येतील, असे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

# कोथिंबिरीला जुडीमागे ६०, मेथीला ४१ रुपयांचा उच्चांकी भाव

### सततच्या पावसामुळे मंचर बाजार समितीत पालेभाज्यांची आवक घटली; ग्राहकांचे बजेट बिघडले, शेतकऱ्यांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या संततधार पावसाचा परिणाम आता भाजीपाला बाजारावर स्पष्टपणे दिसून येत आहे. मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत पालेभाज्यांची आवक लक्षणीयरीत्या घटल्याने त्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. विशेषतः कोथिंबिरीला प्रति जुडी ६० रुपये, तर मेथीला प्रति जुडी ४१ रुपये असा हंगामातील उच्चांकी भाव मिळाल्याने बाजारात या दरांची जोरदार चर्चा सुरू आहे.

दि. २८ जून ते ३ जुलै २०२६ या कालावधीत झालेल्या मुसळधार पावसामुळे कोथिंबीर, मेथी, शेपू आणि पालक या पालेभाज्यांच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी पिके पाण्यात बुडाली, तर सततच्या ओलाव्यामुळे पिकांची वाढही खुंटली. परिणामी बाजार समितीत येणाऱ्या मालाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले असून उपलब्ध मालाला विक्रमी भाव मिळत आहे.

मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निलेश स्वामी थोरात यांनी सांगितले की, सततच्या पावसामुळे पालेभाज्यांची आवक कमी झाल्याने त्याचा थेट परिणाम बाजारभावावर झाला आहे. या हंगामात कोथिंबीर आणि मेथीला मिळालेला हा आतापर्यंतचा सर्वोच्च भाव असून, पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहिल्यास दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

आंबेगाव, शिरूर आणि



राजगुरूनगर तालुक्यातील मोजक्याच शेतकऱ्यांकडे सध्या कोथिंबीर व मेथीची पिके शिल्लक आहेत. सततच्या पावसामुळे बहुतांश क्षेत्रांतील पालेभाज्यांचे नुकसान झाल्याने बाजारात मालाची टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनाही मागणीनुसार माल उपलब्ध होत नसल्याचे चित्र आहे.

पालेभाज्यांच्या वाढलेल्या दरामुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळत असला, तरी ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे. रोजच्या स्वयंपाकातील आवश्यक घटक असलेल्या कोथिंबीर, मेथी, पालक आणि शेपू यांच्या वाढत्या किमतींमुळे गृहिणींना घरगुती अर्थसंकल्प सांभाळताना कसरत करावी लागत आहे.

दरम्यान, हवामानात सुधारणा होऊन पावसाचा जोर कमी झाल्यानंतर पालेभाज्यांची आवक वाढेल आणि बाजारभाव पुन्हा स्थिर होतील, अशी अपेक्षा व्यापारी व ग्राहकांकडून व्यक्त केली जात आहे. सध्या मात्र मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत पालेभाज्यांना मिळालेल्या विक्रमी दरांमुळे शेतकरी समाधानी, तर ग्राहक चिंतेत असल्याचे चित्र आहे.

# खोटी बुकिंग ऑर्डर दाखवून ‘जी.जी.आर ट्रान्सपोर्ट’ची ६५ लाखांची फसवणूक; भोसरी येथील घटना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोसरी :** एका नामांकित ट्रान्सपोर्ट कंपनीला खोटी बुकिंग ऑर्डर दाखवून आणि वेळेवेळी ॲडव्हान्स स्वरूपात रक्कम घेऊन तब्बल ६५ लाख ६८ हजार ५६५ रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार भोसरी येथे उघडकीस आला आहे. डिसेंबर २०२५ पासून मार्च २०२६ दरम्यान स्पाईन रोडवरील 'जी.जी.आर ट्रान्सपोर्ट'च्या ऑफिसमध्ये ही फसवणूक झाली.

याप्रकरणी अनिल हरीभाऊ ढोबळे (वय ३५, रा. भोसरी) यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी १) जयश्रीकुमारी नितेंद्र प्रसाद (वय ४४, रा. जमशेदपूर, झारखंड) आणि २) अनिल अरुण नरळे (रा. रहाटणी फाटा, काळेवाडी) यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी आपसात संगनमत करून 'जी.जी.आर ट्रान्सपोर्ट' कंपनीचे मालक गगन सिंगविर्दी यांना खोट्या बुकिंग ऑर्डर्स दाखवल्या. कंपनीचा विश्वास संपादन करून त्यांनी वेळोवेळी तब्बल ६५,६८,५६५/– रुपये ॲडव्हान्स म्हणून घेतले आणि कंपनीची मोठी आर्थिक फसवणूक केली. भोसरी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि आयपीसीच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक मांजरे पुढील तपास करत आहेत.

**काळेवाडीत हॉटेल फोडले; ६० हजारांची रोकड लंपास**

काळेवाडीतील एम. एम. चौक येथील 'शिवकल्याण भोजनालय' या हॉटेलमध्ये अज्ञात चोरट्याने पाठीमागील दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने कपाटातील आणि गल्ल्यातील मिळून एकूण ६०,००० रुपये रोख चोरून नेले. याप्रकरणी हॉटेल व्यावसायिक आदिकराव विश्वासराव भोसले (वय ५३, रा. काळेवाडी) यांनी फिर्याद दिली असून, पोलिसांनी शंकर सोपान सागर (वय १८, रा. थेरगाव) या आरोपीला अटक केली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनि) चव्हाण या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

**महाळुंग्यात 'जी.ई.एरोस्पेस' कंपनीत २ लाखांच्या कॉपरची चोरी; झारखंडचा आरोपी गजाआड**

उत्तर महाळुंगे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील 'जी.ई.एरोस्पेस' या कंपनीत एक मोठी व्यावसायिक चोरी उघडकीस आली आहे. कंपनीचे अधिकारी चंद्रशेखरराव सत्यनारायण सामासानी (वय ३६, रा. मोशी, मूळ - आंध्र प्रदेश) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. आरोपीने कंपनीच्या आवारातून २,००,००० (दोन लाख) रुपये किमतीचे एकूण ४५ किलो ३८० ग्रॅम वजनाचे २० कॉपर कॉईल्स स्वतःच्या फायद्यासाठी चोरून नेले होते.

महाळुंगे पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपी अब्दुल अहद अंसारी (वय ३२, रा. आकुर्डी, मूळ रा. हजारीबाग, झारखंड) याला अटक केली आहे. त्याच्यावर बी.एन.एस. कलम ३०५ (अ) आणि भादंवि ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोउपनि परदेशी आणि पोहवा काळे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

गुन्हेगारीला आळा घालण्याचे पोलिसांचे आवाहन: शहरात वाढत्या चोऱ्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तू आणि दागिन्यांची काळजी घ्यावी, तसेच व्यावसायिक प्रतिष्ठानांनी सीसीटीव्ही कॅमेरे आणि सुरक्षा रक्षक चोख ठेवावेत, अशा सूचना पोलिसांनी दिल्या आहेत.

**भोसरीत ट्रॅव्हल्स पार्किंगमधून बॅटरी आणि स्टींशनींची चोरी**

भोसरी येथील बावर पेट्रोल पंपाच्या पाठीमागे असलेल्या ट्रॅव्हल्स पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या बसमधून (क्र. चक १४ क्ग ९०६३) चोरांनी हातसफाई केली. फिर्यादी दादासाहेब गिर्नादेव ढाकणे (वय ४८, रा. धावडे वस्ती, भोसरी) यांच्या ट्रॅव्हल्समधील बॅटरी आणि स्टींशनी, ज्याची किंमत ४५,००० रुपये आहे, ती चोरून नेण्यात आली.

भोसरी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे: लखन गौतम चौधरी (वय ३०, रा. जळगाव) विजय प्रकाश कोळी (वय ४३, रा. आसोदा, जळगाव) या गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि ठोंबरे आणि पोहवा ढेकणे करत आहेत.

**किरकोळ भांडणाचा राग मनात धरून एकाची हातोडीने वार करून हत्या; आळंदी येथील थरार**

आळंदी (प्रतिनिधी): किरकोळ कारणावरून झालेल्या भांडणाचा राग मनात धरून एका तरुणाने दुसऱ्या व्यक्तीच्या डोक्यात हातोडीने गंभीर वार करून त्याची हत्या केल्याची खळबळजनक घटना आळंदी परिसरातील चहोली खुर्द येथे घडली आहे. ही घटना २ जुलै रोजी रात्री ९:३० च्या सुमारास घडली.

करवीरसींग नथुसींग लोधी (रा. मध्यप्रदेश) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी कंत्राटदार चंद्रकांत पंढरीनाथ भाळवे (वय ४३, रा. देहू फाटा) यांनी फिर्याद दिली असून, आरोपी साहील रामदास दाभाडे (वय २१, रा. चहोली खुर्द, ता. खेड) याला पोलिसांनी तात्काळ अटक केली आहे.

पोलिसांनुसार, आरोपी साहील दाभाडे आणि करवीरसींग लोधी यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला होता. याचाच राग मनात धरून आरोपीने लोधी यांच्या डोक्यात हातोडीने जबर प्रहार केले. या गंभीर हल्ल्यात लोधी यांचा मृत्यू झाला. आळंदी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०३(१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल केला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघ पुढील तपास करत आहेत.

**तुला जिंवत सोडणार नाही’; वाकडमध्ये अनैतिक संबंधांच्या वादातून तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला**

वाकड (प्रतिनिधी): ‘‘तुझे माझ्या पत्नीसोबत असलेले संबंध तोडून टाक‘‘ असे म्हटल्याचा राग मनात धरून एका तरुणाने चाकूने सपासप वार करून गंभीर जखमी केल्याची घटना ताथवडे येथील अशोकनगर भागात घडली आहे. २ जुलै रोजी रात्री १०:३० च्या सुमारास ही घटना घडली.

या हल्ल्यात एक ३१ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी आरोपी सुरज बैच्या सरदार (वय २७ वर्ष, रा. अशोकनगर, ताथवडे) याला वाकड पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुण आणि आरोपी सुरजची पत्नी हे एकमेकांसमोर आले असता, फिर्यादीने आरोपीला ‘‘तुझे माझ्या पत्नीसोबत असलेले संबंध सोड‘‘ असे सांगितले. या गोष्टीचा तीव्र राग आल्याने आरोपी सुरज याने ‘‘तुला आता जिवंत सोडत नाही‘‘ असे म्हणत खिशातील चाकू काढला. त्याने फिर्यादीच्या डाव्या हातावर आणि बरगडीच्या मध्यभागी चाकूने जीवघेणे वार करून गंभीर दुखापत केली. वाकड पोलीस ठाण्यात बी.एन.एस. कलम १०९(१) नुसार खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक झिंझुर्के पुढील तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### मोबाईल घेतल्याच्या संशयावरून पत्नीच्या चेहऱ्यावर वार करून हत्या; म्हाळुंगे येथील धक्कादायक घटना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**म्हाळुंगे :** मोबाईल घेतल्याच्या संशयावरून एका पतीने आपल्याच पत्नीवर जीवघेणा हल्ला करत तिची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. मोई (ता. खेड) येथील गुरुकृपा हौसिंग सोसायटीमध्ये २९ जून रोजी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली असून, याप्रकरणी ३ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चाँद याकुब शेख (वय ४२ वर्ष, रा. मोई, ता. खेड, जि. पुणे) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी आरोपी पती हरालाल सुभाष चंद्र गौतम (वय २८, व्यवसाय- मजुरी, मूळ रा. उत्तर प्रदेश) याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हरालाल याला त्याची पत्नी चाँद हिने त्याचा मोबाईल घेतल्याचा संशय होता. याच संशयावरून त्याने तिच्याशी वाद घालत तिच्या चेहऱ्यावर वार केले व बेदम मारहाण करून तिला जिवे ठार मारले. त्यानंतर तो घटनास्थळावरून पसार झाला होता. याप्रकरणी म्हाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. पुढील तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) देवडे करत आहेत.

### पावसामुळे साथीच्या आजारांचा धोका वाढला; फ्लू, सर्दी-खोकल्याचे रुग्ण वाढले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरात गेल्या तीन-चार दिवसांपासून सुरू असलेल्या सलग पावसामुळे आणि ढगाळ वातावरणामुळे तापमानात चढ-उतार होत आहे. उष्ण व दमट असा हवामानात बदल होत असून, अचानक गारवा वाढल्याने व्हायरल फ्लू, सर्दी, खोकला, ताप आणि अंगदुखी या आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. शहरातील खासगी दवाखाने आणि रुग्णालयांमध्ये अशा रुग्णांची संख्या वाढली आहे. या काळात लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, हवामानातील अचानक बदलामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती काही प्रमाणात कमी होते. त्यामुळे इन्फ्लूएंजा यासारखे विषाणू सहज पसरतात. बहुतांश रुग्णांमध्ये ताप, घसा खवखवणे, सर्दी, खोकला, डोकेदुखी आणि अंगदुखी अशी लक्षणे दिसतात. योग्य औषधोपचार, पुरेसा आराम आणि द्रवपदार्थांचे सेवन केल्यास बहुतांश रुग्ण तीन ते पाच दिवसांत बरे होतात. मात्र, ताप दीर्घकाळ राहिल्यास किंवा श्वास घेण्यास त्रास होत असल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात एम.एस्सी. डेटा सायन्स अभ्यासक्रमास मान्यता

## ग्रामीण विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर उच्च शिक्षणाची नवी संधी


■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स व हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज, मंचर या महाविद्यालयाला महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून एम.एस्सी. डेटा सायन्स हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे आंबेगाव, जुन्नर आणि शिरूर तालुक्यातील विद्यार्थ्यांना आधुनिक, कौशल्याधिष्ठित आणि रोजगाराभिमुख उच्च शिक्षणाची सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे.

आजच्या डिजिटल युगात डेटा सायन्स हे सर्वाधिक मागणी असलेले आणि वेगाने विकसित होणारे क्षेत्र मानले जाते. बँकिंग, आरोग्य, शिक्षण, ई-कॉमर्स, शेती, वाहतूक तसेच विविध सरकारी विभागांमध्ये डेटा सायन्सचा व्यापक वापर होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणक विज्ञानातील उच्च शिक्षणासाठी पुणे किंवा इतर शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ आणि आर्थिक खर्चाची मोठी बचत होणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी दिली.

या अभ्यासक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने मार्च महिन्यात महाविद्यालयाची पाहणी करून शासनाकडे सकारात्मक शिफारस केली होती. महाविद्यालयातील अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा, आवश्यक पायाभूत सुविधा आणि तज्ज्ञ प्राध्यापकांची उपलब्धता लक्षात घेऊन शासनाने अभ्यासक्रमास अंतिम मान्यता प्रदान केली.

महाविद्यालयात सध्या बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम., एम.कॉम., बी.सी.एस. तसेच एम.ए. (मराठी, अर्थशास्त्र, इंग्रजी) आणि एम.एस्सी. (रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, पदार्थविज्ञान) हे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत. याशिवाय वाणिज्य, रसायनशास्त्र आणि वनस्पतीशास्त्र विभागांतर्गत पीएच.डी. संशोधन केंद्रेही कार्यरत आहेत.




राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी), सुसज्ज ग्रंथालय, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, 'कमवा व शिका' योजना तसेच विविध व्यक्तिमत्त्व विकास उपक्रमांमुळे महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. नॅककडून 'अ' ग्रेड प्राप्त तसेच 'कर्मवीर पारितोषिक' विजेते हे महाविद्यालय गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विशेष ओळखले जाते.

दरम्यान, एम.एस्सी. डेटा सायन्सबरोबरच बी.ए. (मानसशास्त्र) आणि एम.कॉम. (बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन) या नव्या अभ्यासक्रमांनाही शासनाची मान्यता मिळाल्याची माहिती महाविद्यालय प्रशासनाने दिली. या नव्या अभ्यासक्रमांमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांच्या करिअरला नवी दिशा मिळण्यास मदत होणार आहे.

### शिरूर बाजार समिती निवडणुकीबाबत उच्च न्यायालयाचे आदेश; नव्याने निवडणूक प्रक्रिया राबविण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे/शिरूर :** शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक प्रक्रियेसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय देताना उच्च न्यायालयाने विद्यमान निवडणूक प्रक्रिया रद्द करून नव्याने निवडणूक घेण्याचे निर्देश दिले आहेत. निवडणूक प्रक्रियेतील काही बाबींवर दाखल झालेल्या याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने हा आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे.

न्यायालयाच्या आदेशानंतर शिरूर बाजार समितीच्या राजकीय घडामोडींना वेग आला असून, सर्व संबंधित उमेदवारांना नव्याने निवडणूक प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर पुढील प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे संकेत आहेत. या निर्णयामुळे शिरूर बाजार समितीच्या निवडणुकीतील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, शेतकरी, सभासद आणि इच्छुक उमेदवारांचे लक्ष आता पुढील निवडणूक कार्यक्रमाकडे लागले आहे.

## विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी 'साहस फाउंडेशन'चे उल्लेखनीय कार्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** विशेष गरजा असलेल्या मुलांना योग्य प्रशिक्षण, प्रोत्साहन आणि संधी मिळाल्यास तेही आत्मविश्वासाने, स्वावलंबीपणे आणि सन्मानाने जीवन जगू शकतात, ही भूमिका कृतीतून अधोरेखित करणारे साहस फाउंडेशन गेल्या नऊ वर्षांपासून विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहे.

सन २०१७ मध्ये सामाजिक कार्यकर्ते सतीश खराडे यांनी स्थापन केलेली साहस फाउंडेशन ही ना-नफा तत्त्वावर कार्य करणारी संस्था असून, पुणे आणि मुंबई परिसरातील शेकडो विशेष मुलांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेचे मुख्य उद्दिष्ट विशेष मुलांना शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि जीवनकौशल्यांच्या माध्यमातून अधिक सक्षम, स्वावलंबी आणि समाजात सक्रिय सहभाग घेण्यास सक्षम बनविणे हे आहे.

संस्थेची ३५ सदस्यांची समर्पित टीम विशेष मुलांच्या घरी जाऊन शारीरिक तंदुरुस्ती, शरीराचा समन्वय, संतुलन, क्रीडा कौशल्ये, दैनंदिन जीवनातील स्वावलंबन तसेच सामाजिक कौशल्यांचा विकास यासाठी नियमित प्रशिक्षण देते. प्रत्येक मुलाने आपल्या क्षमतेनुसार दैनंदिन कामे स्वतंत्रपणे करता यावीत आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने संस्था सातत्याने प्रयत्न करत आहे.

विशेष मुलांमध्ये आत्मविश्वास, सामाजिक सहभाग आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी साहस फाउंडेशनतर्फे ट्रेकिंग, फील्ड ट्रिप, साहसी उपक्रम, क्रीडा स्पर्धा, समूह उपक्रम तसेच विविध कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियमित आयोजन केले जाते. सध्या संस्थेत १०० हून अधिक विद्यार्थी नियमित प्रशिक्षण घेत असून, ५०० पेक्षा अधिक कुटुंबांना संस्थेने मार्गदर्शन, समुपदेशन आणि विविध प्रकारचे सहकार्य उपलब्ध करून दिले आहे. या सामाजिक उपक्रमात सहसंचालक मयूर लोणकर, तांत्रिक प्रमुख एकनाथ पाडेकर, सचिव वैभव गायकवाड, विशेष शिक्षिका सोनाली अहिरे, सुचेता पवार तसेच साहस फाउंडेशनची संपूर्ण टीम समर्पित भावनेने योगदान देत आहे. संस्थापक व संचालक सतीश खराडे म्हणाले, प्रत्येक विशेष मुलामध्ये स्वतःची वेगळी क्षमता आणि गुण असतात. त्यांना योग्य दिशा, सातत्यपूर्ण प्रशिक्षण, आवश्यक आधार आणि समाजाकडून स्वीकार मिळाला, तर ते आपल्या क्षमतेनुसार उत्कृष्ट प्रगती करू शकतात. प्रत्येक विशेष मुलाला सन्मानाने, स्वाभिमानाने आणि स्वावलंबीपणे जीवन जगता यावे, हेच साहस फाउंडेशनचे ध्येय असून त्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.

## व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा : पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** युवकांमध्ये वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या व्यसनाचे दुष्परिणाम अत्यंत गंभीर असून, या विळख्यातून दूर राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी सजग राहणे आवश्यक आहे. सुदृढ जीवनशैलीचा स्वीकार करून व्यसनमुक्त समाज घडविण्यात युवकांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी केले.

आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त महाविद्यालयात आयोजित जनजागृतीपर व्याख्यानात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड होते.

पोलीस निरीक्षक वाघमोडे यांनी आपल्या मार्गदर्शनात अमली पदार्थांच्या वाढत्या व्यसनामुळे व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर, कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर तसेच समाजावर होणारे गंभीर परिणाम उदाहरणांसह स्पष्ट केले. अमली पदार्थांच्या आहारी गेलेली तरुणाई स्वतःचे भविष्य धोक्यात घालतेच, शिवाय गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी घालण्यासही कारणीभूत ठरते, असे त्यांनी सांगितले.

अमली पदार्थांचे सेवन, विक्री आणि तस्करीसंदर्भातील कायदेशीर तरतुदींची माहिती देताना त्यांनी संबंधित कायद्यांतील कठोर शिक्षेची विद्यार्थ्यांना माहिती दिली. संशयास्पद हालचाली किंवा अमली पदार्थांच्या अवैध व्यवहारांची माहिती तातडीने पोलिसांना देऊन नागरिकांनीही या सामाजिक लढ्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीवर भर न देता सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी जनजागृतीचे कार्य हाती घ्यावे, असे सांगितले. निरोगी, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडविण्यासाठी अशा जनजागृतीपर उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. एस. पी. पानसरे यांनी प्रास्ताविकातून आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रम आयोजनामागील उद्देश स्पष्ट करत त्यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. पी. इंझळकर यांनी केले. प्रभावी सूत्रसंचालनातून त्यांनी कार्यक्रमाची सांगड घालत उपस्थितांशी संवाद साधला. शेवटी डॉ. एस. एस. उघडे यांनी प्रमुख पाहुणे, अध्यक्ष, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शाम मिसाळ, डॉ. सुनिल सालके, प्रा. अविनाश झावरे, अजित पवार, अविनाश दळवी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण झाली असून, व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करण्याचा प्रभावी संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

## रिमझिम पावसाने धनगर मेंढपाळांचे हाल; तात्पुरत्या पाल्यांमध्ये चिखल, लहान मुलांसह शेळ्या-मेंढ्यांचे हाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात शुक्रवार (दि. ३) पासून रिमझिम पावसाने हजेरी लावली असून, शुक्रवारी रात्रीही अनेक ठिकाणी हलका पाऊस झाला. शनिवारी सकाळपासून पुन्हा पावसाची रिपरिप सुरू झाल्याने परिसरात ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. या सततच्या रिमझिम पावसाचा सर्वाधिक फटका धनगर मेंढपाळांना बसत असून, त्यांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम झाला आहे.

तालुक्याच्या पूर्व भागातील थोरांदळे, रांजणी, वळती, नागापूर, शिंगवे, पारगाव आदी परिसरात चाऱ्याच्या शोधात आलेल्या धनगर मेंढपाळांची संख्या मोठी आहे. यंदा मान्सूनचे आगमन उशिरा झाल्यामुळे अनेक मेंढपाळ अद्यापही या भागात वास्तव्यास



आहेत. मागील काही महिन्यांपासून त्यांनी तीव्र चारा टंचाईचा सामना केला असून, आता सततच्या रिमझिम पावसामुळे त्यांच्या अडचणींमध्ये आणखी भर पडली आहे.

शेतांमध्ये उभारलेल्या तात्पुरत्या पाल्यांभोवती चिखल साचल्याने मेंढपाळांचे राहणीमान अत्यंत कठीण झाले आहे. पाल्यांमध्ये पाणी शिरत असल्याने लहान मुलांसह शेळ्या-मेंढ्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ओलसर वातावरणामुळे जनावरांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एकीकडे तीव्र चारा टंचाई आणि दुसरीकडे सततचा रिमझिम पाऊस, अशा दुहेरी संकटात धनगर मेंढपाळ सापडले आहेत. या परिस्थितीमुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, जनावरांची देखभाल आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करणेही कठीण बनल्याची व्यथा धनगर मेंढपाळ लखन तीखुळे यांनी व्यक्त केली.

# आषाढी वारी पालखी प्रस्थान सोहळ्याचा पोलीस प्रशासनाकडून नियोजनपूर्व आढावा

## अलंकापुरीत भाविकांना सेवा-सुविधांना प्राधान्य; सुरक्षित वारीसाठी प्रशासन सज्ज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आषाढी वारीनिमित्त होणाऱ्या श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी आळंदीत नियोजनपूर्व पाहणी दौरा केला. यावेळी पालखी सोहळ्याचा पोलीस बंदोबस्त, मान्यवरांच्या दौऱ्याचे नियोजन तसेच वारकरी व भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांचा आढावा त्यांनी प्रशासकीय अधिकारी, आळंदी देवस्थान आणि पालखी सोहळ्याच्या पदाधिकाऱ्यांसमवेत घेतला.

दर्शनबारी परिसर, स्कायवॉक, इंद्रायणी नदीपात्रातील जलपर्णी हटविण्याचे काम, प्रदक्षिणा मार्गाची स्वच्छता तसेच भाविकांसाठी पुरेशा प्रमाणात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदी सुविधांबाबत संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. यात्रा काळात भाविक व नागरिकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश पुणे जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

पालखी प्रस्थान सोहळ्याच्या नियोजनासाठी खेडचे प्रांताधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेडसे, आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधवराव खांडेकर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपाध्यक्ष सुजाता तापकीर, गटनेते सचिन गिलबिले, विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे, यात्रा समिती सभापती पूजा घुंडरे, माजी विरोधी पक्षनेते डी. डी. भोसले, आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भिमा नरके, श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे, राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजन नाथ, चैतन्य महाराज लोंढे, पुरुषोत्तम महाराज पाटील, रोहिणी पवार, व्यवस्थापक माऊली वीर तसेच नगरपरिषदेचे विविध विभागप्रमुख व आजी-माजी नगरसेवक समन्वयाने काम करत आहेत.

दरवर्षीप्रमाणे दर्शनबारीसाठी तात्पुरत्या सुविधांची उभारणी सुरू झाली आहे. एसटी स्थानक परिसर आणि भैरवनाथ ग्रामदेवता ट्रस्टच्या विस्तीर्ण प्रांगणात यात्रेकरूंसाठी दोन ठिकाणी जर्मन हँगर स्वरूपातील निवारा मंडप उभारण्यात येत आहेत. यावर्षी भक्ती सोपान पूल पाडण्यात आल्याने त्या ठिकाणी नवीन पुलाचे काम प्रस्तावित असून, तोपर्यंत स्कायवॉकवर तात्पुरत्या मंडपाची व्यवस्था करण्यात येत आहे.

'सुरक्षित वारी, हरित वारी' या संकल्पनेवर आधारित पालखी सोहळ्याचे नियोजन अंतिम टप्प्यात आले असून, सर्व शासकीय विभागांमध्ये तयारीची लगबग सुरू आहे. राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी पालखी सोहळा नियोजन बैठकीत दिले आहेत. यात्रेच्या पार्श्वभूमीवर आळंदी देवस्थान, नगरपरिषद, महसूल, आरोग्य, पोलीस,




महावितरण, परिवहन आदी विभागांच्या सातत्याने बैठका होत असून, भाविकांना सुरक्षित, सुव्यवस्थित आणि सुविधायुक्त वारीचा अनुभव मिळावा यासाठी आवश्यक नियोजन केले जात आहे.

दरम्यान, यंदाच्या पालखी सोहळ्यासाठी हलका, आकर्षक आणि विविध आधुनिक सुविधांनी सुसज्ज असा नवीन पालखी रथ तयार करण्यात आला आहे. या रथाचे लोकार्पण सोमवारी (दि. ६) पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अचल दलाल आणि पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती व्यवस्थापक माऊली वीर यांनी दिली.

# संसदेच्या पावसाळी अधिवेशनात घटनादुरुस्तीवरून घमासान?


## पंतप्रधान-मुख्यमंत्र्यांच्या पदावर नवीन निकषांचा प्रस्ताव चर्चेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २० जुलैपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात अनेक राजकीयदृष्ट्या संवेदनशील मुद्दे चर्चेच्या केंद्रस्थानी राहण्याची चिन्हे आहेत. त्यामध्ये पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि मंत्र्यांच्या पदाबाबत प्रस्तावित घटनादुरुस्ती, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या वक्तव्यावरून निर्माण झालेला वाद, तसेच सरकारच्या संसदीय रणनीतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सत्ताधारी आघाडी गंभीर गुन्ह्यांमध्ये अटक होऊन दीर्घकाळ न्यायालयीन कोठडीत राहणाऱ्या सर्वोच्च घटनात्मक पदांवरील व्यक्तींविषयी स्पष्ट घटनात्मक तरतूद करण्याच्या भूमिकेत असल्याचे संकेत मिळत आहेत. या प्रस्तावामुळे सार्वजनिक जीवनातील उत्तरदायित्व वाढेल, असा सरकारचा दावा असू शकतो. मात्र विरोधकांचा प्रश्न वेगळाच आहे. न्यायालयाने दोषी ठरवण्यापूर्वीच एखाद्या लोकप्रतिनिधीचे पद धोक्यात येणे, ही नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांशी विसंगत बाब ठरू शकते, असा त्यांचा युक्तिवाद आहे.

या प्रस्तावामागील राजकीय वेळही तितकीच महत्त्वाची मानली जात आहे. मागील संसदीय अधिवेशनात आवश्यक संख्याबळ नसल्यामुळे काही घटनादुरुस्ती विधेयके पुढे नेता आली नव्हती. त्यानंतर झालेल्या राजकीय घडामोडी, पक्षांतर आणि मित्रपक्षांच्या समीकरणांमुळे सत्ताधारी आघाडीचे गणित काहीसे बदलल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. त्यामुळे यावेळी सरकार अधिक आक्रमक भूमिका घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



दुसरीकडे, विरोधक संसदेत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या कथित दिशाभूल करणाऱ्या वक्तव्याचा मुद्दा उपस्थित करण्याच्या तयारीत आहेत. सरकारने संसदेला चुकीची माहिती दिल्याचा आरोप विरोधक करत असून या प्रकरणावर स्पष्टीकरणाची मागणी होण्याची शक्यता आहे. सरकार मात्र हे आरोप फेटाळत असून विरोधक अनावश्यक राजकीय वाद निर्माण करत असल्याचे सांगत आहे.

या पार्श्वभूमीवर पावसाळी अधिवेशन केवळ विधेयकांपुरते मर्यादित न राहता तीव्र राजकीय संघर्षाचे व्यासपीठ ठरण्याची शक्यता आहे.

एकीकडे सरकार उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि प्रशासनातील शुचिता यांचा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न करेल, तर दुसरीकडे विरोधक लोकशाही संस्थांचे स्वातंत्र्य, न्यायप्रक्रियेचे तत्त्व आणि सत्तेचा संभाव्य गैरवापर या मुद्द्यांवर सरकारला घेरण्याचा प्रयत्न करतील.

घटनातज्ज्ञांच्या मते, अशा स्वरूपाच्या कोणत्याही घटनादुरुस्तीचा परिणाम केवळ सध्याच्या राजकारणापुरता मर्यादित राहत नाही. भविष्यात कोणत्याही सरकारकडून अशा तरतुदींचा वापर किंवा गैरवापर होण्याची शक्यता लक्षात घेऊन कायदेशीर संरक्षण आणि संतुलित यंत्रणा आवश्यक असते. केवळ अटक किंवा न्यायालयीन कोठडीच्या आधारावर घटनात्मक पद रिक्त करण्याची तरतूद केल्यास तिची घटनात्मक वैधता न्यायालयातही तपासली जाऊ शकते.

राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे की आगामी अधिवेशनात सरकारची विधेयके, विरोधकांची आक्रमक भूमिका आणि मित्रपक्षांची भूमिका या तिन्ही गोष्टी निर्णायक ठरणार आहेत. त्यामुळे संसदेतील चर्चा केवळ कायदेमंडळापुरती मर्यादित न राहता देशातील राजकीय वातावरणालाही नवी दिशा देणारी ठरू शकते.

पावसाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच या मुद्द्यांवरून वातावरण तापले असून, संसदेत सरकार आणि विरोधकांमध्ये तीव्र संघर्ष पाहायला मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

---

## सारांश वृत्त

### ममता बॅनर्जींचा बंडखोरांना इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पक्षातील बंडखोर नेत्यांवर कठोर भूमिका घेत जे गेले आहेत त्यांना मी आता महत्त्व देत नाही असे स्पष्ट वक्तव्य केले. या विधानातून त्यांनी पक्ष सोडून गेलेल्या किंवा विरोधकांशी हातमिळवणी केलेल्या नेत्यांना अप्रत्यक्ष इशारा दिला आहे.

तृणमूल काँग्रेसमध्ये काही नेत्यांच्या नाराजी आणि पक्षांतराच्या पार्श्वभूमीवर हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, हा संदेश पक्षातील शिस्त कायम ठेवण्यासाठी आणि विरोधकांना स्पष्ट राजकीय संकेत देण्यासाठी आहे.

### अमेरिकेतील जन्मसिद्ध नागरिकत्व निर्णयाचा परिणाम अपेक्षेपेक्षा मर्यादित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाने जन्मसिद्ध नागरिकत्वाबाबतचा वादग्रस्त आदेश रद्द करत विद्यमान संविधानिक तरतूद कायम ठेवली आहे. या निर्णयामुळे अमेरिकेत जन्मलेल्या स्थलांतरित कुटुंबांच्या मुलांना नागरिकत्व मिळत राहणार आहे. भारतातील H-1B, F-1 आणि L-1 व्हिसाधारक कुटुंबांना तात्काळ दिलासा मिळाला असला तरी, या निर्णयामुळे एकूण स्थलांतर धोरणात मोठा बदल झालेला नाही. ग्रीन कार्डची दीर्घ प्रतीक्षा, व्हिसा कोटा आणि नोकरी-आधारित अवलंबित्व यासारख्या मूलभूत समस्या कायम आहेत. तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय केवळ सध्याची स्थिती कायम ठेवतो; भारतीय स्थलांतरितांसाठी अपेक्षित असलेली मोठी सवलत किंवा धोरणात्मक बदल मात्र यातून दिसत नाही.

---

## पुण्याच्या धरणसाखळीत पाणीसाठा केवळ १६.०६ टक्के; गेल्या वर्षाच्या तुलनेत मोठी तूट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या खडकवासला धरणसाखळीतील चार धरणांमध्ये शनिवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकूण ४.६८ TMC पाणीसाठा नोंदवण्यात आला आहे. हा साठा एकूण क्षमतेच्या १६.०६ टक्के इतका आहे. गेल्या वर्षी याच दिवशी या धरणसाखळीत १७.१५ TMC म्हणजेच ५८.८३ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. त्यामुळे यंदा पाणीसाठ्यात लक्षणीय तूट दिसून येत आहे.

खडकवासला धरणात दिवसभरात १३ मिमी पावसाची नोंद झाली. धरणात सध्या ०.३० TMC म्हणजेच १४.९७ टक्के पाणीसाठा असून, पाणीपातळी ५७८.२७ मीटरवर आहे. धरणाच्या सांडव्यावरून अद्याप पाण्याचा विसर्ग करण्यात आलेला नाही. पानशेत धरण परिसरात ३३ मिमी पाऊस झाला. पानशेतमध्ये २.३० TMC पाणीसाठा असून तो २१.६३ टक्के आहे. धरणाची पाणीपातळी ६१४.६० मीटर नोंदवण्यात आली आहे. वरसगाव धरण परिसरात ३० मिमी पावसाची नोंद झाली. धरणात २.०५ TMC म्हणजेच १५.९७ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, पाणीपातळी ६१४.९० मीटरवर आहे. टेमघर धरण परिसरात सर्वाधिक ५५ मिमी पाऊस झाला. मात्र, धरणातील पाणीसाठा केवळ ०.०३ TMC म्हणजेच ०.९२ टक्के आहे. टेमघरची पाणीपातळी ६६३.२० मीटरवर नोंदवली गेली आहे. चारही धरणांमध्ये एकूण २७२ चउऱ्ह इतकी आवक झाली आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास आगामी दिवसांत धरणसाखळीतील जलसाठ्यात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

---

## दिल्ली दंगली प्रकरण : उमर खालिद आणि शर्जील इमाम यांना पुन्हा जामीन नाकारला; न्यायप्रक्रिया आणि दीर्घ कोठडीवर पुन्हा चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २०२० मधील दिल्ली दंगलीशी संबंधित कटकारस्थानाच्या प्रकरणात आरोपी असलेल्या उमर खालिद आणि शर्जील इमाम यांच्या नव्या जामीन अर्जांना न्यायालयाने नकार दिला. या निर्णयामुळे दीर्घकाळ सुरू असलेल्या न्यायप्रक्रियेवर, कठोर दहशतवादविरोधी कायद्यांच्या वापरावर आणि जामीनाच्या निकषांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

यापूर्वी सर्वोच्च न्यायालयातील एका खंडपीठाने जामीन नाकारण्याच्या आधीच्या आदेशाबाबत काही कायदेशीर प्रश्न उपस्थित केल्यानंतर दोन्ही आरोपींनी नव्याने जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र संबंधित न्यायालयाने उपलब्ध नोंदी आणि प्रकरणाचे स्वरूप लक्षात घेऊन त्यांना दिलासा देण्यास नकार दिला.

या प्रकरणात सरकारी यंत्रणांचा दावा आहे की आरोपींविरुद्ध गंभीर स्वरूपाचे आरोप असून त्यांची सखोल सुनावणी होणे आवश्यक आहे. दुसरीकडे बचाव पक्षाचे म्हणणे आहे की खटल्याचा अंतिम निकाल लागण्यास मोठा कालावधी लागत असताना आरोपी दीर्घकाळ तुरुंगात राहणे हा न्यायप्रक्रियेतील महत्त्वाचा प्रश्न आहे.

दिल्ली दंगलीशी संबंधित प्रकरणे गेल्या काही वर्षांपासून न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यामुळे सुनावणीतील विलंब, जामीन हा नियम की अपवाद, तसेच कठोर कायद्यांच्या अंमलबजावणीतील संतुलन या मुद्द्यांवर कायदेतज्ज्ञ आणि नागरी समाजात सातत्याने चर्चा होत आहे. न्यायालयाचा ताजा निर्णय हा केवळ जामीन अर्जांपुरता मर्यादित असला तरी, प्रकरणाचा अंतिम निकाल अद्याप लागलेला नाही. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असून दोष सिद्ध होईपर्यंत कोणत्याही आरोपीला दोषी मानले जात नाही. पुढील सुनावण्यांमध्ये या खटल्याची दिशा आणि न्यायालयाचे अंतिम निष्कर्ष महत्त्वाचे ठरणार आहेत.

---

## पाकिस्तानचे उपपंतप्रधान इशाक डार अडचणीत; नातवाच्या अटकेनंतर सरकारवर निष्पक्ष तपासाचा दबाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद /लाहोर :** पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक डार यांचे नातू मोहम्मद रझा डार याला लाहोरमधील दोन परदेशी महिलांवरील कथित सामूहिक लैंगिक अत्याचार प्रकरणात अटक झाल्यानंतर देशात तीव्र राजकीय आणि सामाजिक प्रतिक्रिया उमटत आहेत. या प्रकरणामुळे केवळ गंभीर गुन्ह्याच्या तपासाकडेच नव्हे, तर प्रभावशाली राजकीय कुटुंबांशी संबंधित आरोपींविरुद्ध कायद्याची समान अंमलबजावणी होते का, याकडेही लक्ष वेधले गेले आहे.

घटनेनंतर विरोधी पक्ष, मानवाधिकार कार्यकर्ते आणि नागरी समाजातील अनेकांनी तपासावर कोणताही राजकीय प्रभाव पडू नये, अशी मागणी केली आहे. आरोपींची राजकीय पार्श्वभूमी लक्षात घेता तपासाची पारदर्शकता आणि निष्पक्षता कायम ठेवणे ही पाकिस्तानच्या न्यायव्यवस्थेसमोरील मोठी



कसोटी मानली जात आहे.

महिलांविरुद्धच्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांबाबत पाकिस्तानवर यापूर्वीही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

अनेक प्रकरणांमध्ये तपासातील विलंब, साक्षीदारांचे संरक्षण आणि न्याय मिळण्यातील अडथळे यावरून टीका होत आली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास कोणत्या दिशेने जातो, याकडे देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर लक्ष लागले आहे.

दरम्यान, राजकीय विश्लेषकांच्या मते, हा वाद सरकारसाठी प्रतिमेचा प्रश्न ठरू शकतो. सत्ताधारी नेतृत्वाने तपास संस्थांना पूर्ण स्वातंत्र्य दिल्याचा संदेश देणे आवश्यक आहे; अन्यथा विरोधक सरकारवर प्रभावशाली व्यक्तींना संरक्षण दिल्याचा आरोप अधिक तीव्र करू शकतात.

या प्रकरणात तपास सुरू असून, न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही आरोपीला दोषी किंवा निर्दोष मानता येत नाही. पुढील तपास आणि न्यायालयीन निर्णयांवर या प्रकरणाची दिशा अवलंबून असेल.

---

# खामेनेईंच्या कफनाशेजारी दिसलेली लहान शवपेटी; युद्धाच्या सावलीत हरवलेले एक निष्पाप बालजीवन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** इराणचे सर्वोच्च नेते आयातोल्ला अली खामेनेई यांच्या अंत्यसंस्कार सोहळ्यात एक अत्यंत हृदयद्रावक दृश्य पाहायला मिळाले. त्यांच्या कफनाशेजारी ठेवलेली अतिशय लहान शवपेटी अनेकांच्या नजरा थांबवून गेली आणि त्या क्षणाने संपूर्ण वातावरण शोकाकुल झाले. ही शवपेटी त्यांच्या केवळ १४ महिन्यांच्या नातीची होती निष्पाप वय, जीवनाची सुरुवातही पूर्ण न झालेली, आणि तरीही हिंसाचाराच्या सावलीत संपलेले बालजीवन. झहरा मोहम्मदी गोलपायगानी असे या बालिकेचे नाव असून, ती २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या एका हल्ल्यात मृत्युमुखी पडल्याचे सांगितले जाते. या घटनेत खामेनेई यांच्या कुटुंबातील आणखी काही सदस्यांचाही मृत्यू झाल्याची माहिती आहे. तेहरानमधील शोकसभेत या




बालिकेची शवपेटी राष्ट्रीय ध्वजाने झाकलेली ठेवण्यात आली होती. तिचा फोटो बाजूला ठेवण्यात आला होता, मात्र त्या छोट्या शवपेटीनेच उपस्थितांच्या भावनांना अधिक तीव्र धक्का दिला. मोठ्या राजकीय व्यक्तिमत्त्वाच्या अंत्यसंस्कारातही या लहान जीवाच्या अस्तित्वाने युद्ध आणि हिंसाचाराची सर्वात कठोर किंमत पुन्हा एकदा अधोरेखित केली. या घटनेमुळे केवळ एका कुटुंबाचे वैयक्तिक दुःख नव्हे, तर संघर्षाच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवन किती असुरक्षित झाले आहे, हा प्रश्नही पुन्हा पुढे आला आहे.

राजकीय आणि लष्करी संघर्षांच्या केंद्रस्थानी अनेकदा सामान्य नागरिक, विशेषतः मुले, सर्वाधिक बळी ठरतातही कटू वास्तवता या घटनेने पुन्हा अधोरेखित केली. इराणमध्ये या घटनेनंतर शोक आणि संतापाचे मिश्र वातावरण निर्माण झाले आहे. एका बाजूला नेतृत्वाच्या कुटुंबावर झालेला वैयक्तिक आघात, तर दुसऱ्या बाजूला युद्धजन्य परिस्थितीत निष्पाप जीवांचा होणारा बळी या दोन्ही वास्तवांनी समाजमनावर खोल परिणाम केला आहे. विश्लेषकांच्या मते, अशा घटना केवळ राजकीय संघर्षाचे परिणाम नसून, आंतरराष्ट्रीय पातळीवर युद्धनीती आणि मानवी हक्कांच्या प्रश्नांना पुन्हा एकदा केंद्र

---

# स्टेम सेल, जीन थेरपी आणि CAR-T उपचारांवर कडक नियंत्रण; 'ड्रग्ज नियम, १९४५'मध्ये केंद्राची महत्त्वपूर्ण सुधारणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** स्नवी दिल्ली : केंद्र सरकारने 'ड्रग्ज अँड कॉस्मेटिक्स रूल्स, १९४५'मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करत देशातील अत्याधुनिक वैद्यकीय उपचार पद्धतींवर अधिक कडक नियामक नियंत्रण आणले आहे. या सुधारणांनुसार आता सर्व प्रकारचे स्टेम सेल थेरपी, जीन थेरपी आणि झेनोट्रान्सप्लांटेशन (xenografts) संबंधित उपचार केंद्रीय परवाना प्राधिकरणाच्या (Central Licensing Approval Authority - CLAA) कक्षेत आणण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे कर्करोगावरील अत्याधुनिक उपचार पद्धती, विशेषतः CAR-T सेल थेरपीसारख्या प्रगत तंत्रज्ञानावर आधारित उपचारांना अधिक कठोर नियामक चौकटीत आणले गेले आहे. सरकारच्या या पावलामागे रुग्णांची सुरक्षितता, उपचारांची गुणवत्ता आणि वैद्यकीय संशोधनातील नैतिक मानके मजबूत करणे हा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.


**अत्याधुनिक उपचारांवर वाढता नियंत्रणाचा विस्तार**

गेल्या काही वर्षांत भारतात जैवतंत्रज्ञान आणि पुनरुत्पादक वैद्यक (regenerative medicine) क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. स्टेम सेल आधारित उपचार, जीन थेरपी आणि इम्युनोथेरपीसारख्या पद्धती कर्करोगासह अनेक गंभीर आजारांवर आशादायक परिणाम देत आहेत. तथापि, या उपचारांच्या जलद प्रसारामुळे अनेक ठिकाणी मानकीकरणाचा अभाव, अनियंत्रित क्लिनिकल वापर आणि रुग्णांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात होती.

याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने हे बदल लागू करत या सर्व उपचारांना औषध नियमांच्या कक्षेत स्पष्टपणे आणले आहे. यामुळे आता अशा उपचारांसाठी स्वतंत्र परवाना, मान्यता आणि कठोर तपासणी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे.

**CLAA अंतर्गत परवाना प्रक्रिया**

सुधारित नियमांनुसार, कोणतीही संस्था, रुग्णालय किंवा संशोधन केंद्र स्टेम सेल, जीन थेरपी किंवा झेनोग्राफ्ट्सशी संबंधित उपचार किंवा प्रयोग करू इच्छित असल्यास त्यांना केंद्रीय परवाना प्राधिकरणाची मंजुरी घेणे बंधनकारक असेल. या प्रक्रियेत वैज्ञानिक पुरावे, क्लिनिकल चाचण्यांचे निष्कर्ष, रुग्ण सुरक्षिततेचे मानक आणि नैतिक समित्यांची मान्यता यांचा समावेश असेल.




सरकारच्या मते, या प्रणालीमुळे देशभरात उपचारांमध्ये एकसमानता येईल आणि अप्रमाणित किंवा अपूर्ण चाचण्या असलेल्या उपचार पद्धतींवर नियंत्रण ठेवता येईल.

**CAR-T थेरपी आणि कर्करोग उपचारांवर परिणाम**

CAR-T सेल थेरपी ही कर्करोग उपचारातील अत्याधुनिक पद्धतींपैकी एक मानली जाते. या उपचारामध्ये रुग्णाच्या प्रतिकारशक्तीतील T-सेल्समध्ये बदल करून त्यांना कर्करोग पेशींविरुद्ध अधिक प्रभावी बनवले जाते. भारतात या थेरपीचा वापर हळूहळू वाढत असून काही प्रगत रुग्णालयांमध्ये तो उपलब्ध आहे.

नवीन नियमांमुळे या उपचारांच्या उपलब्धतेवर मर्यादा येतील का, अशी चर्चा वैद्यकीय क्षेत्रात सुरू झाली आहे. तथापि, आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे की या निर्णयामुळे उपचार अधिक सुरक्षित आणि वैज्ञानिकदृष्ट्या पडताळलेले होतील, ज्यामुळे दीर्घकालीन फायदा रुग्णांनाच होईल.

**रुग्ण सुरक्षा आणि नैतिक मानके**

सरकारच्या या निर्णयामागे रुग्णांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अनेक प्रकरणांमध्ये अप्रमाणित स्टेम सेल उपचारांमुळे रुग्णांना आर्थिक आणि आरोग्यदृष्ट्या नुकसान झाल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. त्यामुळे अशा उपचारांवर नियंत्रण आणणे आवश्यक असल्याचे मत आरोग्य तज्ज्ञांनीही व्यक्त केले आहे.

याशिवाय, झेनोग्राफ्ट्स-सारख्या (प्राण्यांपासून मानवामध्ये ऊतक प्रत्यारोपण) प्रगत तंत्रज्ञानाशी संबंधित नैतिक आणि जैवसुरक्षा प्रश्नांवरही या नियमांमुळे अधिक स्पष्टता येणार आहे.

**आरोग्य मंत्रालयाची भूमिका**

आरोग्य मंत्रालयाच्या अधिकृत माहितीनुसार, या सुधारणा आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत आहेत. जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील जलद प्रगती लक्षात घेऊन भारतातही मजबूत नियामक चौकट तयार करण्याची गरज होती. मंत्रालयाने नागरिकांना आवाहन केले आहे की कोणत्याही प्रगत उपचारांचा अवलंब करण्यापूर्वी अधिकृत मान्यता आणि वैज्ञानिक पुरावे तपासावेत.

**तज्ज्ञांचे मत आणि भविष्यातील दिशा**

वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, या निर्णयामुळे अल्पकालीन स्वरूपात काही प्रशासकीय अडथळे वाढू शकतात, परंतु दीर्घकालीन दृष्टीने भारतातील जैवतंत्रज्ञान संशोधन अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि जागतिक स्तरावर स्वीकारार्ह होण्यास मदत होईल.

एकूणच, सरकारचा हा निर्णय आधुनिक वैद्यकीय उपचारांना प्रोत्साहन देतानाच त्यावर योग्य नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न मानला जात आहे. रुग्णांचे हित, वैज्ञानिक अचूकता आणि नैतिक जबाबदारी यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न या नव्या नियामक चौकटीत दिसून येतो.